RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक १८(२)] गुरुवार, जून २५, २०२०/आषाढ ४, शके १९४२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०.—** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. . . . . . . पृष्ठे (१-३)

**ग्राम विकास विभाग**

बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक २५ जून २०२०.

**MAHARASHTRA ORDINANCE No. X OF 2020.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Village Panchayats Act.*

**सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०.**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

१९५९ चा ३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०२० असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

१९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १५१ ची सुधारणा

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १५१ मधील, पोट-कलम (१) मध्ये, खंड (क) मध्ये, परंतुका नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईलः— १९५९ चा ३.

" परंतु आणखी असे की, जर नैसर्गिक आपत्ती किंवा आणीबाणी किंवा युद्ध किंवा वित्तीय आणीबाणी किंवा प्रशासकीय अडचणी किंवा महामारी यामुळे राज्य निवडणूक आयोगाने वेळापत्रकानुसार, पंचायतींच्या निवडणुका घेणे शक्य झाले नसेल तर, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा पंचायतीचा प्रशासक म्हणून, योग्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल.".

## निवेदन

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १५१ (१) (क) मध्ये अशी तरतूद आहे की, जर एखादी पंचायत या अधिनियमान्वये कायदेशीरपणे घटित करण्यात आलेली नाही असे राज्य शासनाला कोणत्याही वेळी दिसून आले तर, राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा पंचायतीचे विसर्जन करता येईल आणि त्याच अधिसूचनेद्वारे किंवा तशाच अधिसूचनेद्वारे पंचायतीचे सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये, त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून, अशा रीतीने व अशा कालावधीसाठी व अशा शर्तीच्या अधीनतेने पार पाडण्याची व्यवस्था करता येईल. पुनर्घटित केलेल्या पंचायतीची पहिली सभा, उक्त अधिनियमाच्या कलम २८ अन्वये ज्या तारखेस घेण्यात येईल त्या तारखेपासून उक्त अधिसूचना अंमलात असण्याचे बंद होईल.

२. राज्याच्या १९ जिल्ह्यांमधील १५६६ ग्रामपंचायतींची मुदत एप्रिल, २०२० ते जून, २०२० दरम्यान आणि १२६६८ ग्रामपंचायतींची मुदत जुलै, २०२० ते डिसेंबर, २०२० दरम्यान समाप्त होत आहे. देशातील, तसेच महाराष्ट्रातील सध्याचा कोविड-१९ महामारीचा प्रादुर्भाव, तसेच केंद्र सरकारने व राज्य शासनांनी वेळोवेळी घोषित केलेली टाळेबंदी विचारात घेता, राज्य निवडणूक आयोगाकडून उपरोक्त पंचायतींच्या निवडणुका केव्हा घेण्यात येतील याबबत अनिश्चितता आहे.

ही बब विचारात घेता, जर नैसर्गिक आपत्ती किंवा आणीबणी किंवा युद्ध किंवा वित्तीय आणीबणी किंवा प्रशासकीय अडचणी किंवा महामारी, इत्यादीमुळे राज्य निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार, पंचायतींच्या निवडणुका घेणे शक्य झाले नसेल तर, राज्य शासनास, पंचायतींचा प्रशासक म्हणून, योग्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल, अशी तरतूद करणे इष्ट वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २४ जून २०२०.

**भगत सिंह कोश्यारी,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अरविंद कुमार,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.